|| श्री स्वामी समर्थ ||

**अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्रंबकेश्वर जि नाशिक**

**श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत)**

# "पर्यावरण प्रकृती विभाग" अंतर्गत "वृक्षारोपण व संवर्धन अभियान"

## ❋ विधिवत वृक्षारोपण करावयाची पद्धत - वनस्पती तंत्र

❖ **वृक्षारोपण कोणत्या जागी करावे ?** रस्त्याच्या कडेला, शाळा, कॉलेज, बगीचा, हॉस्पिटल, मंदिर परिसर, खुल्या जागेत(ओपन स्पेस), नदी काठावर, शेताच्या कडेला, बांधावर, पटांगण, वन-दुर्ग-किल्ले-गड आदी ठिकाणी लेखी/तोंडी परवानगी घेवूनच वृक्षारोपण करावे.

❖ **वृक्षारोपण करण्यासाठी निवड करावयाची वृक्षरोपे -** देशी जातीची वृक्ष, नक्षत्रवृक्ष, राशीवृक्ष, फळ झाडे(रानमेवा), उत्पन्न देणारी वृक्ष, दुर्मिळ वृक्ष, आरोग्यवर्धक वृक्ष, 21 श्री गणेश पत्री, विविध प्रकारचे धार्मिक वन (पंचवटी वाटिका, नवग्रह, महाभारत, रामायण, पंचमहाभूत, बुद्ध, जैन, शीख, मुस्लीम, ख्रिस्ती, पारसी वन)

❖ **वृक्षारोपण करण्यासाठी लागणारे साहित्य -** कुदळ, फावडे, पहार, पाटी/घमेली, पाण्यासाठी बादली/ कॅन, विटा, माती, शेणखत/ कंपोस्ट खत/ गांडूळ खत, निंबोळी पेंड, लागवडीसाठी लागणारी देशी रोपे, विधिवत वृक्षारोपण करावयाचे पत्रक.

❖ **झाडे लावताना घ्यावयाची काळजी-**

- परवानगी घेऊनच संबंधित जागेची पाहणी करावी मग वृक्षारोपण करावे.
- वृक्षारोपणासाठी किमान २ X २ X २ ते ३ X ३ X ३ फूट या आकारात खड्डा असावा.
- वृक्षाचे प्रकार (आकारमान, उंची, वाढ) याप्रमाणे खड्यामध्ये अंतर किमान १५ ते २० फुट असावे.
- वृक्षरोपण करताना खड्यात माती व खत हे २ :१ या प्रमाणात एकत्र करावे.
- रोप/ कलम लावताना पिशवीतून झाड काढून मातीसह खड्ड्यात लावावे. तसेच झाडाच्या मुळांना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. वृक्षरोपण नंतर भरपूर पाणी घालावे.
- वृक्षरोपण करतांना पूर्व-उत्तराभिमुख बसून वनस्पतींचा मंत्र **||ॐ वं वनस्पती देवताभ्यो नमः||** किमान ११ वेळा म्हणावा.
- यजुर्वेदातील ३८ वी ऋचा म्हणून नेहमी वृक्षरोपण करावे.

  **देवीरूपसूज मधुमती रयक्षाय प्रजाम्य: | तासामास्थाना दुज्जिहतामोषश्वय: सुपिप्पला: ||**

  वरील मंत्र म्हणून वृक्षरोपण केल्यास तो बहरतो. दीर्घजीवी व फलसमृद्ध होतो. झाडाच्या मुळांवर या मंत्राचे पठण करीत, पाणी मुळांवर शिंपडावे आणि मंत्र म्हणतच वृक्षरोपणही प्रत्यक्षात करावे.
- वृक्ष लागवडीनंतर शक्यतो त्या भोवती संरक्षक कुंपण (ट्री गार्ड) करावे. गाई, बकरी व पाळीव प्राण्यांपासून संरक्षण करावे.
- वृक्ष संवर्धन करतांना त्यास आवश्यकतेनुसार पाणी घालावे. पाणी सकाळी किंवा सायंकाळी घातल्यास उत्तम असते. जमीन तापलेली असतांना पाणी घातल्यास मुळांना इजा होते.
- वृक्षारोपण करताना **"पर्यावरण प्रकृती विभाग वृक्षरोपण व संवर्धन अभियान"** असे ठळक अक्षरात नमूद केलेले विभागाचे बॅनर असावे. तसेच विधिवत वृक्षरोपण करायची पद्धती ही माहिती सर्व भाविक सेवेकऱ्यांना द्यावी.
- वृक्षरोपण व संवर्धनासाठी शालेय विद्यार्थी, महिला पुरुष सेवेकरी, शासकीय अधिकारी, स्वयंसेवी संस्था, आदींना वृक्षांचे आध्यात्मिक, वैज्ञानिक, आरोग्य व पर्यावरण दृष्ट्या महत्व समजून त्याचा सहभाग वाढवावा.

## -: दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक मार्गातील ग्राम व नागरी अभियानातील विभाग :-

परमपावन भारतभूमीत परमात्म्याने स्वतःच निर्माण केलेल्या हिंदू धर्माच्या प्रचारासाठी व रक्षणासाठी अनेक थोर ऋषी, योगी, महात्मे यांच्याद्वारे जे कार्य झाले; तेच कार्य कलियुगातील अवतार पूर्णब्रम्ह भगवान श्री स्वामी समर्थ महाराजांनी सदगुरू प. पू. मोरेदादांच्या हातून श्री क्षेत्र दिंडोरी येथे वेगवेगळ्या पद्धतीने उभे केले व आजच्या विज्ञाननिष्ठ अवकाश क्रांतीच्या विज्ञानालाही आकलन न होणाऱ्या सर्व समस्यांवर मात करणे, प्रत्येक जीवाला दु:खमुक्त करणे, शांत व सुखी जीवन प्रदान करणे, त्यांच्या हातून धर्मकार्य करून घेणे, त्याला मोक्षाप्रत नेणे, आजपर्यंत कोणत्याही संताने न केलेल्या अश्या आगळ्या वेगळ्या कार्यामुळे दिंडोरी हे आध्यात्मिक पीठ व तीर्थक्षेत्र बनले. या केंद्राची महाराष्ट्रासह १६ राज्यात व विदेशातही उपकेंद्रे कार्यरत आहेत. सेवा मार्गातील विभागातून वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक समस्या सोडवून गावाचा विकास करून सामर्थ्यशाली राष्ट्र बनविण्याचे कार्य दिंडोरी प्रणीत श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पिठाधीश प.पू. गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे लाखो सेवेकार्यांच्या माध्यमातून सेवा मार्गाच्या ग्रामविकास अभियानातून राबवीत आहेत सेवा मार्गातील १६ विभाग खालील प्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| १) बालसंस्कार विभाग | (५) कृषी विभाग | (९) याज्ञिकी विभाग | (१३) पशु व गोवंश विभाग |
| २) प्रश्नोत्तर विभाग | (६) भारतीय संस्कृती व मराठी अस्मिता | (१०) स्वयंरोजगार विभाग | (१४) माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ३) विवाह संस्कार विभाग | (७) कायदेशीर सल्लागार विभाग | (११) प्रशिक्षण विभाग | (१५) महिला सक्षमीकरण विभाग |
| ४) आरोग्य व आयुर्वेद विभाग | (८) वास्तुशास्त्र विभाग | (१२) पर्यावरण प्रकृती विभाग | (१६) देश व विदेश विभाग |

**अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्रंबकेश्वर जि नाशिक**

**श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत)**

**"पर्यावरण प्रकृती विभाग" अंतर्गत "वृक्षारोपण व संवर्धन अभियान"**

---

## वृक्ष लागवडीसाठी उपयोगी विविध प्रकारची वृक्षरोपे

- **लक्ष्मीवर्धक वनस्पती :-** पांढरी जास्वंदी, पांढरी शेवंती, पांढरी कण्हेर, पांढरी रुई, पांढरी भुईरिंगणी, पांढरी गुंज, आवळा, बेल.
- **संरक्षक वनस्पती :-** पांढरीकाठी, काळा धोतरा, निळी निर्गुडी, कृष्ण तुळस, झेंडू,
- **पाऊस पडण्यासाठी लाभदायक वृक्ष :-** सुचीपर्णी, वेत, आंबा, साग, बांबू
- **दुष्काळी भागात/ कमी पाण्यात लावता येण्याजोगी झाडे :-** शमी, बोर, कर, सिताफळ, डाळिंब, पेरू, आवळा, लिंबू, फालसा, बेल, कवठे, जांभूळ, करवंद, कडूनिंब, शिसम, आपटा, कुंभ, तुती, मोह,
- **जलद वाढणारी झाडे :-** कदंब, बाभूळ, खैर, महारूख, शिरीष, निम, भोकर, सुरु, कैलासपती, शिसम, करंज, खेजरी, शिवण, सावर, अगस्ती/हादगा, शेवरी, जांभूळ,
- **जमिनीची धूप थांबविणारी झाडे व झुडुपे :-** कडूलिंब, बाभूळ, शेवरी, औदुंबर, करंज, सिताफळ, शिसम, सुरु, भोकर, बांबू, शेवगा, वाळा, केवडा, शमी, एरंड, तगर, शेर, खैर, निर्गुडी, घायपात, भेंडी, लाजाळू,
- **प्रदूषण रोखणारी झाडे :-** वड, पिंपळ, शिरस, कदंब, विलायती चिंच, कडुलिंब, तुळस, बहावा, सावर, अशोक, सिताअशोक, चिंच, मोह, बाभूळ, आवळा, रायआवळा, फणस, बोर, भोकर, सप्तपर्णी, अंजन, पेरू, गुलमोहर, आंबा, बेल, तुती, बांबू, सिताफळ, पळस, साग, जांभूळ, पारिजात, रक्तचंदन
- **मोठी फुल झाडे :-** बहावा, जारुल, पारिजातक, अनंत, पळस, पांगारा, काटेसावर, शिरीष, रजनी, खवस, करवंद, सोनचाफा,
- **प्रदूषण रोखणारी झुडुपे :-** (घराजवळ, गॅलरीत, कुंडीत, लावण्याजोगी रोपे वाढ साधारण १० ते १५ फुट)
  एरंड, मंदार, घाणेरी, करवंद, सदाफुली, धोतरा, भुईआवळा, तुळस, काटी, आईसक्रीम फ्लॉवर, सुर्यफुल, बोगनवेल

### <u>कृषी ऋषी / शेतकऱ्यांसाठी आवश्यक वृक्षरोपे :-</u>

- **खते कीटकनाशकेसाठी उपयुक्त वृक्ष :-** कडुलिंब, करंज, निर्गुडी, रुई, पपई,सीताफळ.
- **दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी :-** कदंब, तुती, अंजन, शतावरी, गुळवेल.
- **पशुधनासाठी उपयुक्त औषधी वृक्ष :-** तुळस, अडुळसा, कोरफड, शतावरी, कढीपत्ता, पुदिना, जायफळ, वेखंड, अश्वगंधा, ब्राम्ही, पारिजातक, गवतीचहा, जेष्ठमध, रानभेंडी.
- **शेती मोबदला देणारी कुंपणासाठी व प्राण्यांपासून संरक्षक झाडे :-** घायपात, करवंद, शिकेकाई, सागरगोटा, रिठा, छरमा,
- **रानमेवा (फळ झाडे) उत्पन्न देणारी वृक्ष:-** आंबा, आवळा, औदुंबर, जांभूळ, पेरू, सिताफळ, फणस, बोर, भोकर, बेल, चिंच, रामफळ, करवंद.
- **पशु व गोवंशसाठी चारा पिके :-** मका, ज्वारी, बाजरी, चवळी, मारवेल, मोठा पवना, नेपिअर गवत, राजमुग, गजराज.

### <u>आध्यात्मिक वृक्षरोपे :-</u>

- **राशी वृक्ष :-** मेष–खैर, वृषभ-औदुंबर, मिथुन-जाडेमिरे, कर्क-पळस, सिंह-मंदार, कन्या- जाडेमिरे, तूळ-औदुंबर, वृश्चिक-खैर, धनु-पिंपळ, मकर-शमी, कुंभ-शमी, मीन-पिंपळ.
- **नक्षत्रवृक्ष (२७ नक्षत्रांचे आराध्यवृक्ष) :-** कुचला, आवळा, औदुंबर, जांभूळ, खैर, कृष्णागरु/अगरु, बांबू/वेळू, पिंपळ, नागचाफा, वड, पळस, पायरी, जाई, बेल, अर्जुन, नागकेशर, सावर, राळ, वेत, फणस, शमी, कळंब, आंबा, कडूनिंब, मोह.
- **नक्षत्रवन पर्यायी वृक्ष:-** अडूळसा, चंदन/बेहडा, उंडील/सुरंगी, अंबष्ट, रिठा, वेहेंकळ, निर्गुडी, तुळस, वेहेंकळ/पारिजात, बकुल/केवडा, देवदार/लोध्र, देवबाभूळ, अशोक, आपटा/कांचनार, जेष्ठमध/चिंच.
- **श्री गणेशपत्री :-** दुर्वा, तुळस, कण्हेर, मंदार, शमी, डाळिंब, माका, मधुमालती, बेल, धोतरा, आघाडा, आपटा, अर्जुन, सादडा, देवदार, मरवा, विष्णुकांत, जाई, बोर, अगस्ती/हादगा, निर्गुडी किंवा पिंपळ, केवडा किंवा डोरली/रानवांगी
- **हवनास लाभदायक वृक्ष समिधा:-** रुई, पळस, खैर, आघाडा, पिंपळ, औदुंबर, शमी, वड, आंबा, बेल, चंदन, देवदार,
- **जास्त ऑक्सिजन देणारी वृक्ष:-** वड, तुळस, पिंपळ, औदुंबर, कडुलिंब

---

**संपर्क :- श्री स्वामी समर्थ प्रधान सेवा केंद्र, दिंडोरी, जि. नाशिक महाराष्ट्र फोन :- 02557-221710, मोबाईल: 7755941721, 9860418186**

**ई-मेल आयडी: ppvdindori@gmail.com वेबसाईट: www.dindoripranit.org**